संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक

mandeshexpressatp@gmail.com

दैनिक माणदेशी बुलंद आवाज...

# माणदेश एक्सप्रेस

संपादक : दिपक गौतम प्रक्षाळे
मोबा. ९५९५०४७६७६/९५०३६३८६८६

www.mandeshexpress.com

● वर्ष : ७ वे ● ● अंक : ५३ वा ● ● मंगळवार दि. २९ ऑगस्ट २०२३ ● ● किंमत २ रू ● पाने : ४ ● RNI : MAHMAR/2017/77021 Postl Reg : SGL/143/2023-2025




# उमदी येथे अन्नातून विषबाधा झालेल्या विद्यार्थ्यांची प्रकृती धोक्याबाहेर

## जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी : विद्यार्थ्यांची प्रकृती चांगली व धोक्याबाहेर

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** समता अनुदानित आश्रमशाळा, उमदी (ता. जत) येथील अन्नातून विषबाधा झालेल्या विद्यार्थ्यांच्या प्रकृतीबाबत व सर्वोत्तम उपचाराबाबत जिल्हा व आरोग्य प्रशासन सतर्क आहे. सर्व विद्यार्थ्यांची प्रकृती चांगली व धोक्याबाहेर असून परिस्थिती नियंत्रणाखाली असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी काल मिरज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयास भेट देऊन, तेथे उपचारासाठी दाखल करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रकृतीची विचारपूस करून त्यांना धीर दिला. तसेच, जत, माडग्याळ, कवठेमहांकाळ येथील रूग्णालयात दाखल असलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रकृतीबाबत आढावा घेतला. यावेळी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी तृप्ती धोडमिसे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. सुधीर नणंदकर आदि उपस्थित होते.यावेळी जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी या विद्यार्थ्यांच्या उपचारामध्ये कोणतीही कसूर ठेवू नये, अशा सूचना आरोग्य प्रशासनास दिल्या.



**सांगली : मिरज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे उपचारासाठी दाखल करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रकृतीची विचारपूस करताना डॉ. राजा दयानिधी**

### विद्यार्थ्यांवर चार ठिकाणी उपचार

समता अनुदानित आश्रमशाळा, उमदी (ता. जत) येथील विद्यार्थ्यांना दि. २७ ऑगस्ट रोजी संध्याकाळी जेवणानंतर अन्नातून विषबाधा झाल्याने उलटी, जुलाब अशी लक्षणे दिसून आली. या मुलांना तात्काळ ग्रामीण रुग्णालय जत, माडग्याळ, कवठेमहांकाळ आणि मिरज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयामध्ये दाखल करण्यात येऊन त्यांच्यावर औषधोपचार सुरू करण्यात आले. वेळीच उपचार झाल्याने बाधित सर्व विद्यार्थ्यांची प्रकृती चांगली व धोक्याबाहेर असून परिस्थिती नियंत्रणाखाली असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी सांगितले.

आतापर्यंत मिळालेल्या माहितीनुसार जत ग्रामीण रूग्णालय येथे ८१ विद्यार्थी, ग्रामीण रूग्णालय, माडग्याळ येथे २१, ग्रामीण रूग्णालय, कवठेमहांकाळ येथे ४१ आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, मिरज येथे २६ अशा एकूण १६९ विद्यार्थ्यांवर उपचार करण्यात येत आहेत. २४ तास विद्यार्थ्यांना वैद्यकीय पथकाच्या निरीक्षणाखाली ठेवण्यात येणार आहे. या मुलांच्या उपचारावर जिल्हा प्रशासन आणि आरोग्य प्रशासनाने योग्य ती खबरदारी घेतली आहे. मिरज वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयात दाखल विद्यार्थ्यांचे तपासणीसाठी नमुने घेण्यात आले आहेत.

### घटनेचा चौकशी अहवाल सादर करण्याच्या सूचना

दरम्यान, या घटनेची संपूर्ण चौकशी करून २४ तासाच्या आत अहवाल सादर करण्याच्या सूचना सहायक आयुक्त, समाजकल्याण यांना दिल्या आहेत. चौकशीअंती दोषींवर शासकीय नियमानुसार कारवाई करण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी सांगितले.

### खबरदारी घेण्याच्या सक्त सूचना

जिल्ह्यातील सर्व शासकीय अनुदानित आणि विनाअनुदानित आश्रमशाळा, वसतिगृहे प्रमुखांनी मुलांना आहार देताना व शिजवताना अत्यंत काळजीपूर्वक, सतर्क राहून स्वच्छ, पोषक, आरोग्य दायी व भेसळमुक्त आहार देण्याची खबरदारी घ्यावी, अशा सक्त सूचना जिल्हाधिकारी यांनी केल्या आहेत. यासंदर्भात प्राथमिक आरोग्य केंद्र / ग्रामीण रूग्णालय स्तरावर पथके गठीत करून वसतिगृहे व आश्रमशाळेची नियमित तपासणी करून त्यांना मार्गदर्शनही करण्यात येणार आहे. वसतिगृहे व आश्रमशाळा प्रमुखांनी विद्यार्थ्यांना आहार देताना नेहमीच योग्य ती खबरदारी घ्यावी. यापुढे असा अनुचित प्रकार घडल्यास संबंधितांवर कडक कारवाई करण्यात येईल, असे जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी सांगितले.

# लेंगरेवाडीच्या सरपंच वंदना लेंगरे यांच्यावरील अविश्वास ठराव मंजूर

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** आटपाडी तालुक्यातील लेंगरेवाडी ग्रामपंचायतच्या सरपंच यांच्यावर दाखल करण्यात आलेला अविश्वास ठराव बहुमताने मंजूर झाला. यामुळे सत्ताधारी शिवसेनेला मोठा धक्का बसला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी लेंगरेवाडी ग्रामपंचायतीच्या झालेल्या पंचवार्षिक निवडणुकीमध्ये शिवसेनेने सत्ता मिळवली होती. सरपंच वंदना बजरंग लेंगरे यांची सरपंच म्हणून निवड करण्यात आली होती. अडीच वर्षाच्या कालावधीमध्ये सरपंच वंदना बजरंग लेंगरे यांनी मनमानी केल्यास आरोप करत आठ ग्रामपंचायत सदस्यांनी आटपाडीचे तहसीलदार श्रीमती बाई माने यांच्याकडे अविश्वास ठराव दाखल केला होता.

काल या अविश्वास ठरावावर मतदान घेण्यात आले. परंतु अविश्वास ठरावाच्या वेळी सरपंच वंदना लेंगरे ह्या हजर राहिल्या. त्यामुळे त्यांच्याविरुद्ध आठ विरुद्ध एक असा बहुमताने ठराव मंजूर करण्यात आला. ठरावाच्या बाजूने जगन्नाथ ब्रम्हदेव खटके, रक्माबाई लेंगरे, नंदा महाणवर, रविंद्र डिगोळे, सुनिता काळे, वासुदेव लेंगरे, सुशीला जानकर, मालन लेंगरे या सदस्यांनी मतदान केले. तर सरपंच वंदना लेंगरे यांच्या बाजूने एक ही मतदान झाले नाही. त्या स्वत: यावेळी गैरहजर राहिल्या.

# अमरसिंह देशमुख यांचा अनिलभाऊ बाबर यांनी केला सत्कार

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** दि.बाबासाहेब देशमुख सहकारी बँकेला महाराष्ट्र राज्य सहकारी बँक्स असोसिएशन लि. मुंबई यांच्या तर्फे दिल्या जाणारा 'पद्मभूषण वसंतदादा पाटील उत्कुष्ट नागरी बँक' पुरस्कार जाहीर झाला असून याबद्दल आमदार अनिलभाऊ बाबर यांनी बँकेचे संस्थापक चेअरमन अमरसिंह देशमुख यांचा बाबासाहेब देशमुख मिल्क प्रोड्युसर कंपनी या ठिकाणी जावून त्यांचा सत्कार केला.



**आटपाडी : अमरसिंह देशमुख यांचा सत्कार करताना आम.अनिलभाऊ बाबर, यावेळी उपस्थित अरुण बालटे, भाऊसाहेब गायकवाड, ऋषीकेश देशमुख, मुन्ना तांबोळी**

महाराष्ट्र राज्य सहकारी बँक्स असोसिएशन लि. मुंबई यांच्या तर्फे पुणे गटात २५० ते ५०० कोटी पर्यंतच्या ठेवी असणाऱ्या गटामध्ये दि. बाबासाहेब देशमुख सहकारी बँकेला पुरस्कार प्राप्त झाला आहे. याबाबतचे पत्र महाराष्ट्र राज्य सहकारी बँक्स असोसिएशन लि. मुंबईने बँकेला दिले असून दिनांक २३ सप्टेंबर रोजी नाशिक येथे होणाऱ्या कार्यक्रमात सदरचा पुरस्कार दिला जाणार आहे.

बँकेला मिळालेल्या या पुरस्कारामुळे आमदार अनिलभाऊ बाबर यांनी बँकेचे संस्थापक चेअरमन व प्रमुख अमरसिंह देशमुख यांचा सत्कार केला. यावेळी माजी जि.प. सदस्य अरुण बालटे, आटपाडी बाजार समितीचे माजी सभापती भाऊसाहेब गायकवाड, माजी संचालक ऋषिकेश देशमुख, दिघंची ग्रामपंचायतीचे सदस्य मुन्ना तांबोळी यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. २०१९ च्या विधानसभेला आमदार अनिलभाऊ बाबर हे बाबासाहेब देशमुख मिल्क प्रोड्युसर कंपनी या ठिकाणी पाठींबा बाबत झालेल्या बैठकीला गेले होते. त्यानंतर प्रथमच या ठिकाणी गेल्याने तालुक्यातील राजकारणात देशमुख-बाबर गटात एकोपा पहावयास मिळत आहे.

# आटपाडी तालुक्यातील जनावरांचे फेर लसीकरण करा

## पै. संतोष पुजारी : बाजार समितीची पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्याकडे मागणी

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** आटपाडी तालुक्यातील जनावरामध्ये लम्पी रोगाचा प्रादुर्भाव वाढत आहेत. त्यामुळे तालुक्यातील जनावरांचे फेर लसीकरण करण्याची मागणी आटपाडी बाजार समितीच्या वतीने पशुवैद्यकीय अधिकारी यांच्याकडे करण्यात आली असून त्याबाबतचे निवेदन ही देण्यात आले असल्याची माहिती बाजार समितीचे सभापती पै. संतोष पुजारी यांनी दिली.



**आटपाडी : तालुक्यातील जनावरांचे लसीकरण करावे या मागणीचे निवेदन पशुवैद्यकीय अधिकारी यांना देताना सभापती संतोष पुजारी, संचालक, सुबराव पाटील, सुनील तळे, सुनील सरक, शशिकांत जाधव**

आटपाडी तालुक्यातील जनावरांचे लसीकरण झाले आहे.परंतु लम्पी रोगाचा प्रादुर्भाव वाढत चालला आहे. त्यामुळे तालुक्यातील सर्व जनावरांचे पुन्हा लसीकरण करणे गरजेचे बनले आहे.पशुपालकांनी जनावरांचे लसीकरण करण्याची मागणी बाजार समितीकडे केली आहे. त्यामुळे तालुक्यातील सर्व जनावरांना मोफत लसीकरण करावे व त्यासाठी आवश्यकता भासल्यास खाजगी डॉक्टरांची मदत घ्यावी व लवकरात लवकर लसीकरण करावे अशी मागणी करण्यात आली आहे.

आटपाडी पंचायत समितीचे पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.यशोदीप कांबळे यांना याबाबतचे निवेदन देण्यात आले असून यावेळी बाजार समितीचे संचालक सुबराव पाटील, संचालक सुनील तळे,संचालक सुनील सरक यांच्यासह बाजार समितीचे सचिव शशिकांत जाधव यावेळी उपस्थित होते.

# शिंदे, पवार, भाजपाचे आमदार एकमेकांचे कपडे फाडतील : वडेट्टीवार

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**नागपूर :** महाविकास आघाडी सरकार जाऊन शिंदे-फडणवीस सरकार आल्यानंतर आमच्या मतदारसंघातील कामांना स्थगिती देण्यात आली आहे.



**विजय वडेट्टीवार**

पण, आता शिंदे, फडणवीस आणि अजित पवार यांच्या निधी वाटपावरून लाथाळ्या वाढतील. हे तिघेही एकमेकांचे कपडे फाडताना दिसतील, असे वक्तव्य विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केले.

नि्धी वाटपावरून भेदभाव केला जात आहे. विरोधी पक्षांच्या आमदारांच्या मतदारसंघासाठी निधी दिला जात नाही. याबाबत विचारले असता वडेट्टीवार म्हणाले, आमच्या मतदारसंघातील कामांना स्थगिती सरकारने दिली आहे. आता सत्तेत सहभागी असलेल्यांमध्ये निधी वाटपावरून लाथाळ्या वाढणार आहेत. पावसाचे प्रमाण कमी असून अनेक भागांत दुष्काळी स्थिती आहे. भविष्यात पाण्याची टंचाई होईल. पण सरकार सभा घेण्यात व्यस्त आहे. दुष्काळी स्थितीकडे सरकारने दुर्लक्ष झाल्यास लोक त्यांना फिरू देणार नाहीत, असेही ते म्हणाले.

# मी राष्ट्रवादीचा राष्ट्रीय अध्यक्ष आहे

## अजित पवार : शरद पवारांना थेट आव्हान?

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**पुणे :** राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष कोण? हा वाद आता थेट निवडणूक आयोगाकडे पोहोचला आहे. अजित पवार गटानं पक्षावर व निवडणूक चिन्हावर दावा सांगितल्यानंतर आता राष्ट्रीय अध्यक्षपदही आमच्याकडे असल्याची भूमिका अजित पवार गटानं घेतली आहे. त्याचवेळी समोरून शरद पवार यांनी आपण पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष असून जयंत पाटील महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष असल्याची भूमिका मांडली आहे. त्यामुळे दोन्ही बाजूंनी वेगवेगळे दावे केले जात असताना आता खुद्द अजित पवारांनीच आपण पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष असल्याचं विधान केलं आहे.



**अजित पवार**

हसन मुश्रीफ यांनी कोल्हापुरात बोलताना पक्षाच्या सर्व ५३ आमदारांनी शरद पवारांना सरकारमध्ये सहभागी होण्यासंदर्भात पत्र दिलं होतं, असं विधान केलं. त्यावर प्रतिक्रिया देताना शरद पवारांनी त्यांनी पत्र दिलं होतं, पण त्यावर चर्चा झाली होती, निर्णय नाही. चर्चा आणि निर्णय यात फरक आहे. जयंत पाटील पक्षाचे महाराष्ट्र अध्यक्ष आहेत आणि मी राष्ट्रीय अध्यक्ष आहे. यासंदर्भातला निर्णय आमच्याकडून होईल, अशा आशयाचं विधान केलं होतं.

एकीकडे शरद पवारांनी भूमिका स्पष्टपणे मांडली असताना दुसरीकडे सुनील तटकरे अजित पवार राष्ट्रीय अध्यक्ष असल्याची भूमिका मांडताना दिसले. निवडणूक आयोगाकडून आमच्या बाजूने निर्णय लागेल असा आम्हाला विश्वास आहे. अजित पवार आमचे राष्ट्रीय अध्यक्ष आहेत हे आम्ही याचिकेत सांगितलं आहे. त्यामुळे त्यासंदर्भात योग्य तो निर्णय होईल, असं सुनील तटकरे म्हणाले.

दरम्यान, आत्तापर्यंत पक्षाच्या अध्यक्षपदाविषयी अजित पवार यांनी स्पष्ट भूमिका मांडलेली नव्हती. मात्र आज पुण्यात घेतलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी यावर वक्तव्य केलं आहे. सुनील तटकरेंनी केलेल्या विधानाबाबत पत्रकारांनी अजित पवारांची प्रतिक्रिया विचारली असता त्यावर मला माझ्या सहकाऱ्यांनी केलं आहे. त्यामुळे मी आहे, असं अजित पवार म्हणाले आहेत.




# तेलगी प्रकरणात चार्जशीटमधील नावं खोडणारा अदृश्य हात कुणाचा? : जितेंद्र आव्हाड

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** रविवारी बीडमध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांची सभा पार पडली. या सभेत मंत्री छगन भुजबळ यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्यावर टीका केली. तेलगीला अटक करत मोक्का लावण्याचे निर्देश मी दिले होते. पण, त्यानंतर शरद पवारांनी माझा राजीनामा घेतला, असा हल्लाबोल छगन भुजबळांनी केला होता. अशात आमदार जितेंद्र आव्हाड यांनी सूचक असं ट्वीट केलं आहे.



**जितेंद्र आव्हाड**

तेलगीला अटक करत त्याच्यावर मोक्का लावण्याचे आदेश मी दिले. तेव्हा शरद पवारांनी मला बोलावलं आणि राजीनामा देण्यास सांगितलं. १९९२-९३-९४ साली शरद पवारांवरही आरोप झाले होते. पण, शरद पवारांचा राजीनामा कोणी मागितला नाही. मग माझा राजीनामा का घेतला? असा सवाल भुजबळांनी पवारांना विचारला.

जितेंद्र आव्हाड ट्वीट करत म्हणाले, तेलगी प्रकरणाचा तपास सीबीआयने केला. सीबीआयने चार्जशीट तयार केली आणि ती चार्जशीट कायदेशीर तपासणीसाठी महाधिवक्ता अमरेंद्र शरण यांच्याकडे पाठवली. त्यांचा दुसऱ्या दिवशी सकाळी मला फोन आला आणि त्यांनी मला दिल्लीला बोलावून घेतलं. दिल्लीला गेल्यानंतर त्यांनी मला संपूर्ण प्रकरण समजावून सांगितलं. तेव्हा मी त्यांना सांगितले की, याबाबत तुम्ही शरद पवार साहेबांशी चर्चा करा.

**पान नं. २ वर**



# संपादकिय

## टीकेचा सूर अंगलट आला

शिवसेना पाठोपाठ राष्ट्रवादी काँग्रेस मध्ये फुट पडली, अन राज्यातील वातावरण ढवळून निघाले. शिवसेना फुटीनंतर राज्यातील मतदार हे शिवसेना उद्धव ठाकरे यांच्या बाजूने असल्याचे दिसून आले. अनेक सभा या उद्धव ठाकरे यांनी गाजवून सोडत गद्दारावर तुटून पडले. तर फुटीर आमदार यांच्या सभांना मात्र म्हणावी तशी गर्दी अन दर्दी ही दिसली नाही. तशीच काहीशी परिस्थिती ही राष्ट्रवादी मध्ये दिसून येत असल्याने शरद पवार यांच्या सभांना दिसून येत असून फुटीर राष्ट्रवादीच्या सभांना मात्र होत असून शरद पवार यांच्यावर होणाऱ्या टीकेला मात्र, मतदार आणि कार्यकर्ते अन नेत्यांचे भाषण मधेच रोखत असल्याचे चित्र निमण झाले आहे.
राज्यामध्ये रविवारचा दिवस राजकारण्यांच्या तीन सभांना गाजवला. हिंगोलीत उद्धव ठाकरे, परभणीमध्ये शासन आपल्या दारी हा भव्य दिव्य कार्यक्रम आणि बीडमध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार  यांच्या सभेमुळे साऱ्या राज्याचे लक्ष या सभांकडे लागून राहिले होते. बीडमधील सभेसाठी कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी आपल्या होम पिचवर जोरदार शक्ती प्रदर्शन करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे नागरिकांची जोरदार गर्दीही जमवली होती. मात्र नेत्यांची भाषणं सुरु झाल्यापासूनच अजितदादांच्या सभेत गोंधळ घालण्यास सुरुवात झाली होती. या सभेत अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळांनी  सभेत बोलताना राष्ट्रवादीच्या सर्वेसर्वा असलेल्या शरद पवारांवर निशाणा साधताच उपस्थितींतून गोंधळ घालण्यास सुरुवात झाली.
बीडमध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांची सभा ठरल्यापासूनच साऱ्यांचे त्या सभेकडे लक्ष वेधले होते. त्यामुळे धनंजय मुंडे यांनी जोरदार तयारी करुन गर्दी केली होती. मात्र नेत्यांच्या टीकात्मक भाषणबाजीमुळे मात्र अजितदादांच्या सगळ्या सभेची हवाच निघून गेली. कारण दुपारी तीन वाजता असलेली सभा सायंकाळी सहा नंतर सुरु झाली. त्यामुळे कार्यकर्त्यांचा उत्साह निघून गेल्यानंतरही नेत्यांनी टीकेचा सूर लावल्याने पवार प्रेमींनी आपला रोष व्यक्त करायला सुरुवात केली. त्यामुळेच छगन भुजबळ यांनी शरद पवार यांच्यावर टीका करायला सुरु केल्यानंतर मात्र कार्यकर्त्यांनी गोंधळ घालण्यास सुरुवात केली. कार्यकर्त्यांच्या भावना लक्षात घेतल्यामुळेच मंत्री छगन भुजबळ यांनी त्याचमुळे आपलं भाषण आवरतं घेतलं.
बीडमध्ये झालेल्या सभेतून धनंजय मुंडे, छगन भुजबळ यांनी शरद पवार यांच्यासह शरद पवार यांच्या गटातील नेत्यांवर आणि शरद पवार यांच्यावर निशाणा साधण्याचा प्रयत्न केला. धनंजय मुंडे यांनी थेट जितेंद्र आव्हाड यांच्यावर टीका करत शरद पवार यांची मर्जी राखरण्यासाठी अजित पवार यांच्यावर टीका करत असाल तर ते शरद पवार यांचे संस्कार नाहीत अशा शब्दात त्यांनी त्यांचा समाचार घेतला. मंत्री छगन भुजबळ यांनी शरद पवार यांच्यावर टीका करताना त्यांनी तेलगी प्रकरणाचा उल्लेख करत त्या प्रकरणात आपल्याबरोबर शरद पवार यांच्याही नावाचा उल्लेख केला होता. याची आठवण सांगितली. तर त्याच वेळी त्यांनी सांगितले की, माझ्या मतदार संघात येऊन माझी माफी मागितली मात्र अशा प्रकारे कोणाकोणाच्या मतदार संघात जाऊन तुम्ही माफी मागणार असा सवाल करताच सभेतील उपस्थितांनी गोंधळ घालण्यास सुरुवात केली. त्यामुळे छगन भुजबळांना आपलं भाषण आवरत घ्यावं लागलं. त्यानंतर झालेल्या अजितदादांच्या भाषणामध्ये मात्र त्यांनी शरद पवार यांच्यावर बोलणं टाळत सभा आवरती घेतली. त्यामुळे येथून पुढे शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील फुटीरवादी नेत्यांना टीकेचा सूर आवरता घ्यावा लागणार हे मात्र नक्की !

# अप्रमाणित व अवैध वजन, मापे वापरणे बेकायदेशीर

**माणदेश एक्सप्रेस न्युज**
**सांगली :** अप्रमाणित व परदेशातून आयात केलेले वजन काटे व वैध परवाना नसलेल्या व्यक्तींनी तयार केलेले अवैध वजन काटे विक्री करणाऱ्यांच्या विरोधात विशेष तपासणी मोहिम वैधमापन शास्त्र विभागाकडून हाती घेण्यात येत आहे.
अप्रमाणित अवैध वजन काटे याचा वापर व विक्री संबंधितांनी त्वरीत थांबवावी, अन्यथा त्यांना कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागेल व अशी अवैध वजन काटे जप्त केली जातील. वैध परवाना नसलेल्या व्यक्तिने सुध्दा अप्रमाणित वजन काट्याचे उत्पादन व विक्री त्वरीत थांबवावी, असे आवाहन वैधमापन शास्त्र सांगली कार्यालयाचे उपनियंत्रक द. प्र. पवार यांनी केले आहे.
केंद्र शासनाकडून वैध प्रतिकृती मान्यता प्रमाणपत्र घेवून वैधमापन शास्त्र कायद्यातील तरतुदीनुसार तयार केलेली व स्थानिक निरीक्षकांव्दारे विहित पद्धतीने पडताळणी मुद्रांकन केलेली वजन मापे व तोलन उपकरणे हि प्रमाणित वजन माप असून अशीच वजन मापे व्यवहारात किंवा सुरक्षेकरिता वापरणे कायद्याने बंधनकारक केलेले आहे. वैध मापन शास्त्र कायद्यातील तरतुदीनुसार जी प्रमाणित नसतील अशा अवैध वजन मापांचा वापर कायद्याने प्रतिबंधित केलेला असून ती जप्त करून वापरकर्त्यांवर दंडात्मक कारवाई करण्याची तरतूद वैधमापन शास्त्र कायद्यात आहे. त्यामुळे वैध प्रमाणित वजन मापे व इलेक्ट्रॉनिक काट्यांचा वापर उपयोगकर्त्यांनी आपल्या व्यवहारात करावा, असे आवाहनही श्री. पवार यांनी केले आहे.
अवैध व अप्रमाणित वजन मापांच्या वापरामुळे अचूक मोज मापाची खात्री देत येत नसल्याने उपयोगकर्त्यांना आपल्या व्यवहारामध्ये नुकसान सुद्धा होऊ शकते, शिवाय यामध्ये फसवणुकीच्या दृष्टीने सहजासहजी फेरफार केला जाण्याची सुद्धा शक्यता असते. त्यामुळे उपयोगकर्त्यांनी अशा अवैध वजनमाप व इलेक्ट्रॉनिक काट्यांचा वापर त्वरित थांबवावा.
कोणत्याही वजन मापांची उत्पादन विक्री व दुरुस्ती या बाबी वैधमापन शास्त्र कायद्याव्दारे नियमित केल्या जात असल्याने त्या करण्यासाठी वैध परवान्याची आवश्यकता असते. त्यामुळे वैध परवाना नसलेल्या व्यक्तींनी वजन मापाचे उत्पादन, विक्री व दुरुस्ती करू नये. अशी कृती बेकायदेशीर असून या करिता कायद्यात दंडाची तरतूद आहे. त्यामुळे परदेशातून आयात केलेले परंतु शासनाचे वैध प्रतिकृती मान्यता प्रमाणपत्र नसलेले व वैध परवान्याशिवाय सुटे भाग एकत्र करून बनविलेले अशी वजन मापे व इलेक्ट्रोनिक काटे  अप्रमाणित असून त्यांची विक्री व वापर कोणत्याही व्यक्तींनी करू नये. ऑनलाईन ई कॉमर्स साईटवरुन वजन मापे खरेदी करणाऱ्यांनीसुध्दा कायदेशीर बाबीची खात्री करुनच वजन काटे खरेदी करावेत. विक्रेत्यांनी सुध्दा कायद्यातील तरतुदीची पुर्तता होत असल्याची खात्री करावी, असे आवाहन श्री. पवार यांनी केले आहे.

# कोरेगाव भीमा चौकशी आयोगसमोर प्रकाश आंबेडकर यांची आज साक्ष


प्रकाश आंबेडकर

**माणदेश एक्सप्रेस न्युज**
**पुणे :** कोरेगाव भीमा चौकशी आयोगासमोर मंगळवारी (२९ ऑगस्ट) वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांची साक्ष नोंदविली जाणार आहे. तसेच वरिष्ठ पोलीस अधिकारी रश्मी शुक्ला यांनाही आयोगाने उलटतपासाणीसाठी पाचारण केले आहे. या शिवाय वरिष्ठ पोलीस अधिकारी विश्वास नांगरे पाटील यांची आयोगासमोर उलटतपासणी पूर्ण झाली आहे.
कोरेगाव भीमा येथे १ जानेवारी २०१८ रोजी हिंसाचार झाला होता. या प्रकरणी निवृत्त न्यायाधीश न्यायमूर्ती जे. एन. पटेल आणि निवृत्त मुख्य सचिव सुमित मलिक असा दोन सदस्यीय आयोग स्थापन करण्यात आला आहे. या आयोगाकडून मुंबई आणि पुण्यात उलटतपासणी घेण्यात येत आहे. त्याकरिता विविध राजकीय नेते, प्रशासनातील अधिकारी, या भागातील ग्रामपंचायतींचे सरपंच, सदस्य आदी विविध जणांची साक्ष, उलटतपासणी घेण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून ही घटना घडली तेव्हा नांगरे पाटील हे कोल्हापूर परिक्षेत्राचे महानिरीक्षक होते. कोरेगाव भीमा हा भाग त्यांच्या अखत्यारित होता. त्यामुळे घटना घडली तेव्हा कायदा सुव्यवस्था राखण्याबाबत काय उपाययोजना केल्या होत्या. याबाबत नांगरे पाटील यांनी फेब्रुवारी २०२२ मध्ये आयोगाकडे प्रतिज्ञापत्र सादर केले होते. त्यावर त्यांची शनिवारी (२६ ऑगस्ट) ड. रोहन जमादार-माळवदकर, ड. राहुल मखरे आणि सरकार पक्षाचे वकील ड. शिशीर हिरे यांनी उलटतपासणी घेतली.
दरम्यान, वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष आंबेडकर यांना साक्ष देण्यासाठी आयोगाने मंगळवारी पाचारण केले आहे. तसेच तत्कालीन पुण्याच्या पोलीस आयुक्त वरिष्ठ पोलीस अधिकारी शुक्ला यांनाही आयोगाने उलटतपासणीसाठी बोलाविले आहे. या दोघांनाही आयोगाने २९ आणि ३० ऑगस्ट रोजी पाचारण केले आहे, अशी माहिती आयोगाचे वकील ड. आशिष सातपुते यांनी दिली.

## तेलगी प्रकरणात चार्जशीटमधील नावं खोडणारा अदृश्य हात कुणाचा? : जितेंद्र आव्हाड

**पान नं. १ वरुन :** शरद पवार साहेबांमध्ये आणि त्यांच्यामध्ये चर्चा झाली.
त्यानंतर दोन महिन्यांनी चार्जशीट दाखल करण्यात आली. त्यानंतर जी ओरिजनल चार्जशीट होती, ज्यामध्ये ती नावे होती ती सगळी वगळण्यात आली होती. यामधून आपल्याला जो अर्थ काढायचा आहे, तो काढून घ्या. एक अदृश्य हात सगळी नाव खोडून गेला तो अदृश्य हात कुणाचा समझने वाले को इशारा काफी होता है, असं म्हणतं आव्हाडांनी भुजबळांना लक्ष्य केलं आहे.

## ठाकरेंच्या सभेत जिवंतपणा, अजित पवारांच्या सभेत मुर्दाडपणा !

**विजय वडेट्टीवार : जनता आता त्यांच्यावर विश्वास ठेवायला तयार नाही**

**माणदेश एक्सप्रेस न्युज**
**नागपूर :** बीडमध्ये अजित पवारांच्या सभेत बळजबरीने आणलेली लोक होते. उद्धव ठाकरेंच्या सभेत जिवंतपणा होता, तर अजित पवारांच्या सभेत मुर्दाडपणा होता. तसे ही हे लोक जनतेला काय सांगणार? बेईमानी केली, पक्ष फोडला, जनतेसोबत दगाबाजी केली, हे सांगणार का? हे सर्व जनतेला दिसते आणि जनता आता त्यांच्यावर विश्वास ठेवायला तयार नाही, असे म्हणत असे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी सत्ताधाऱ्यांवर जोरदार प्रहार केला.
पुढे बोलताना ते म्हणाले, यांची आता जिरवायची, असा निर्णय जनतेने घेतला आहे. त्यामुळे त्यांचे आता काही खरे नाही. प्रफुल्लल पटेल यांच्याबाबत बोलताना म्हणाले, कशाच्या भरवशावर पटेल असं म्हणत आहेत? निवडणूक आयोग काय निर्णय देणार आहे, तो निर्णय गुप्त पद्धतीने झालाही असेल आणि तो निर्णय प्रफुल्लल पटेल यांना माहीत असेल म्हणून ते तसे बोलत आहे. निवडणूक आयोगाने विश्वास गमावला आहे. हा पक्ष बळकावण्याचा प्रयत्न आहे आणि तो केंद्र सरकारच्या आशीर्वादाने होत आहे. तोच विश्वास प्रफुल्ल पटेल यांना आहे. शिंदे फडणवीस सरकार असताना आमच्या आमदारांना निधी मिळत नव्हता. आता अजित पवार अर्थमंत्री झाले असताना फक्त काँग्रेसचे आमदार आणि उद्धव ठाकरे यांच्या आमदारांच्या मतदारसंघात निधीला स्थगिती आहे.
कोकण सोडून पूर्ण महाराष्ट्रभर दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली आहे. खरिपाचे पीक पूर्णपणे नष्ट झाला आहे. कोरड्या दुष्काळाची स्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे भविष्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई होणार, शेतकऱ्यांचे हाल होणार, हे दिसत आहे. मात्र शासन सभांमध्ये अडकले असल्याची टीका ही विजय वडेट्टीवार यांनी केली.

# शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारांचे वितरण



पुणे : विजेत्यांना क्रीडा पुरस्कार प्रदान करताना राज्यपाल रमेश बैस

**माणदेश एक्सप्रेस न्युज**
**पुणे :** भारत २०३६ चे यजमानपद भूषविण्याच्यादृष्टीने पूर्वतयारी करत असून राज्यानेही प्रत्येक क्रीडा प्रकारातील आपली बलस्थाने आणि कमकुवत दुवे ओळखून या ऑलिम्पिक स्पर्धेच्या पूर्वतयारीचा 'रोडमॅप' तयार करावा, असे आवाहन राज्यपाल रमेश बैस यांनी केले.
शिवछत्रपती क्रीडा संकुल (बॅडमिंटन हॉल), महाळुंगे, बालेवाडी येथे आयोजित शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार वितरण सोहळ्यात ते बोलत होते. कार्यक्रमाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील, पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील, ग्राम विकास व पंचायत राज मंत्री गिरीश महाजन, क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, खासदार श्रीरंग बारणे, क्रीडा विभागाचे प्रधान सचिव रणजित सिंह देओल, क्रीडा व युवक सेवा आयुक्त डॉ. सुहास दिवसे आदी उपस्थित होते.
राज्यपाल श्री.बैस म्हणाले, ऑलिम्पिक स्पर्धेच्या माध्यमातून आपल्या खेळाडूंना घरच्या प्रेक्षकांसमोर चांगली कामगिरी करण्याची संधी मिळेल. क्रीडातज्ज्ञ आणि खेळाडूंच्या सहकार्याने आवश्यक पायाभूत सुविधांच्या विकासासाठी योजना तयारी करण्यात यावी. शालेय स्तरावरील विविध स्पर्धांच्या आयोजनात विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविण्यावरही भर द्यावा लागेल.
महाराष्ट्र हे क्रीडा धोरण बनविणारे पहिले राज्य आहे. आजही देशपातळीवर क्रीडा क्षेत्रात राज्याचा दबदबा आहे. महाराष्ट्राने राष्ट्रीय स्तरावर चांगली कामगिरी केली असली तरी आंतरराष्ट्रीय स्तरावर उत्तम सामुहिक कामगिरीसाठी अधिक तयारी करण्याची गरज आहे. विशेषत: स्थानिक खेळांकडेही लक्ष द्यावे लागेल, असे सांगतानाच राज्यात फुटबॉलच्या विकासासाठी महाराष्ट्राने पुढाकार घेतल्याबद्दल राज्यपालांनी आनंद व्यक्त केला.
समर्पित प्रशिक्षक आणि निवृत्त खेळाडू ही आपली खरी शक्ती आहे. खेळाडूंच्या प्रशिक्षणासाठी त्यांचे सहकार्य आणि पुरस्कार प्राप्त खेळाडूंच्या गुणवत्तेचा उपयोग करून घ्यायला हवा. 'मिशन लक्ष्यवेध'च्या माध्यमातून राज्यातील खेळाडूंना प्रोत्साहन मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. खेळाडूंची महत्वाकांक्षा, निष्ठा आणि संकल्प त्यांना अडचणीतून मार्ग काढत यशाला गवसणी घालण्यात मदत करेल, असेही श्री.बैस म्हणाले.
राज्यपाल महोदयांच्या हस्ते महाराष्ट्र शासनाच्यावतीने सन २०१९-२०, सन २०२०- २१ व सन २०२१-२२ या वर्षासाठी देण्यात येणाऱ्या शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवन गौरव पुरस्कार, उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार, खेळाडू पुरस्कार, एकलव्य खेळाडू पुरस्कार (दिव्यांग खेळाडू), साहसी क्रीडा पुरस्कार व जिजामाता पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. एकूण ११९ खेळाडू आणि प्रशिक्षकांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. श्रीकांत शरदचंद्र वाड यांना सन २०१९-२० या वर्षाचा तर दिलीप बळवंत वेंगसरकर यांना सन २०२०-२१ या वर्षाचा शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.

# फॅबटेक टेक्नीकल कॅम्पस मध्ये कार्यशाळा संपन्न



सांगोला : येथे तांत्रिक शिक्षणातील प्रकल्प मार्गदर्शकांची भूमिका या कार्यशाळेत मार्गदर्शन करताना डॉ.सुभाष व्ही.जाधव

**माणदेश एक्सप्रेस न्युज**
**सांगोला :** फॅबटेक टेक्नीकल कॅम्पस, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग अॅंड रिसर्च, च्या संशोधन आणि विकास विभागाने तांत्रिक शिक्षणातील प्रकल्प मार्गदर्शकांची भूमिका या विषयावर कार्यशाळेचे आयोजन केले होते.
याप्रसंगी संशोधन आणि विकास विभागाचे प्रमुख डॉ.सुभाष व्ही.जाधव यांनी प्राध्यापकांना मार्गदर्शन केले.विद्यार्थ्यांकडून दर्जेदार संशोधन कार्य कसे करून घ्यावे, विद्यार्थ्यांच्या प्रकल्प उपक्रमाचा उपयोग समाजासाठी फायदेशीर उत्पादने तयार करण्यासाठी कसा करायचा आणि विद्यार्थ्यांचे संशोधन कार्य कसे प्रकाशित करायचे याविषयी त्यांनी प्राध्यापकांना  मार्गदर्शन केले.
या कार्यक्रमात फॅब्रटेक टेक्नीकल कॅम्पस चे सर्व विभागप्रमुख व प्राध्यापक उपस्थित होते. हा कार्यक्रम संस्थेचे चेअरमन भाऊसाहेब रुपनर व मॅनेजिंग डायरेक्टर डॉ.अमित रुपनर, कार्यकारी संचालक दिनेश रुपनर, कॅम्पस डायरेक्टर डॉ.संजय आदाटे, संचालक डॉ.डी.एस.बाडकर, डिग्री इंजिनिअरिंग प्राचार्य डॉ.रवींद्र शेंडगे, पॉलिटेक्निक प्राचार्य डॉ.शरद पवार व प्रा.टी.एन.जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला.

ग्राहक सेवेची विश्वासू परंपरा
नदाफ शॉपी
लग्न बस्त्या ची खरेदीची खास सोय
उत्तम कॉलिटीचे फर्निचर, भांडी, नामवंत कंपनींचे इलेक्ट्रॉनिक्स, आकर्षक गिफ्ट वस्तू मिळण्याचे एकमेव ठिकाण...!

* लग्न वस्त्याची खास सोय
* घरपोच सेवा
* विक्री पाश्चात विनम्र सेवा
* 10 ते 30 % खरेदीवर डिस्कॉउंट
* इंटरिअर रेडीमेड फर्निचर माफक दरात उपलब्ध
* शाळा, ऑफीस, ग्रामपंचायतीसाठी लागणारे सर्व साहित्य
* लग्न बस्त्याच्या रुकवत * प्रशस्त पार्किंगची सेवा
४६ वर्षांची अविरत सेवा
खरेदीसाठी सह परिवारा सोबत एक वेळ अवश्य भेट द्या !
ग्राहकांचा विश्वास... हच आमचा ध्यास.....
Mob : 9730194061

माणदेश एक्सप्रेस
व्यवसायिक जाहिरात योजना
आपल्या व्यवसायाचा प्रचार, प्रसार करण्यासाठी दैनिक 'माणदेश एक्सप्रेस' ने आणली आहे अल्प दरात जाहिरात योजना आहे.
आटपाडी तालुक्यासह सांगली तसेच माणदेशातील अग्रगण्य दैनिक माणदेश एक्सप्रेस च्या माध्यमातुन आपली जाहिरात ५० हजार लोकपर्यंत पोहचवा.
10 X 5 cm १०००/- रुपयात महिनाभर
10 X 10 cm २०००/- रुपयात महिनाभर
20 X 7 cm ३०००/- रुपयात महिनाभर
20 X 13 cm ४०००/- रुपयात महिनाभर
टीप : आतील पानासाठी हे दर १० टक्के कमी आहेत
याशिवाय विशेष स्किम, विविध योजांची माहिती देणाऱ्या बातम्यांना प्रसिद्धी दिली जाईल.
आजच संपर्क करा
९५९५०४७६७६, ९५०३६३८६८६



कलर व त्यासाठी लागणारे सर्व साहित्य मिळण्याचे एकमेव ठिकाण
सिध्दीविनायक कलर एजन्सी
कलरचे माहेरघर...
विजय कालीदास पाटील ८४०८९९९९४/८४८४०७२४३४
राहूल कालीदास पाटील ७४२०९५०७०७/९८९०५०२३१०
पत्ता
दिघंची रोड जय भवानी बिल्डींग समोर, आटपाडी-शाखा १
दिघंची मायणी रोड दिघंची, शाखा-दिघंची २

दैनिक माणदेश एक्सप्रेस हे पत्रक श्री. शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक, मालक श्री. दीपक गौतम प्रक्षाळे यांच्यासाठी कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२, महावीरनगर, सांगली. पीन ४१६४१६ महाराष्ट्र येथे छापून विठ्ठलनगर, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली पिन- ४१५३०१ महाराष्ट्र येथून प्रसिद्ध केले. या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इ. विषयी संपादक, मुद्रक, प्रकाशक, मालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No- MAHMAR/2017/77021 (आटपाडी न्यायकक्षेत)

दैनिक
माणदेशी बुलंद आवाज...
# माणदेश एक्सप्रेस






# सांगली जिल्ह्यात संभाजीराव थोरात तात्यांनी लक्ष द्यावे : विश्वासराव पुजारी

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** शिक्षक बांधवांच्या प्रश्नांसाठी कैलासवासी माजी आमदार शिवाजीराव पाटील यांच्या ध्येयधोरणावरती कार्यरत असणारा आणि संभाजीराव थोरात तात्या यांच्या हाती सर्व सूत्रे असणारी महाराष्ट्र राज्यातील बलाढ्य संघटना म्हणजे शिक्षक संघ. या शिक्षक संघामध्ये २०१० साली सांगली जिल्ह्यामधून तात्यांच्या सोबतीला कवठेमहांकाकाळचे अशोक पाटील, तालुक्यातून मी स्वतः विश्वास पुजारी आणि माहूलीचे भोसले त्या तिघांनी तात्यांना साथ दिली.

शिक्षक संघाचे काम वाढवून संघटना मजबूत केली. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये सांगली जिल्ह्यातील तात्यांची संघटना बलाढ्य मानली जाते. कै.शिवाजीराव पाटील यांनी विद्यमान जिल्हाध्यक्ष चा मनमानी आणि विक्षिप्त स्वभाव ओळखल्याने त्यांना जिल्हाध्यक्ष पद नाकारले. पद नाकारल्यामुळे संभाजीराव थोरात गटात येऊन सगेसोयरे हाताशी धरून थोरात गटाचे जिल्हाध्यक्ष पद मिळवले. सोबतीला संपूर्ण जिल्ह्यातून मोठी ताकद उभी राहिली. तात्यांनी सांगली जिल्ह्याला विभागीय अध्यक्ष, राज्यउपाध्यक्ष महिला आघाडी अध्यक्ष, राज्यकार्याध्यक्ष, प्रसिद्ध प्रमुख अशी महत्वाची पदे दिली. परंतु बँकेत सत्ता नसल्यामुळे सत्तेचा नाद असलेल्या कार्यकर्त्यांमध्ये संघामध्ये नाराजी दिसून येत होती.

संघामध्ये अनेकांचे अंतस्तवाद चव्हाट्यावर आले. संघटनेचे सर्वेसर्वा असणारे तात्यांनी मात्र या प्रत्येक गोष्टीकडे दुर्लक्ष केले. शिक्षक बँकेच्या निवडणुकीमध्ये स्वतः तात्यांनी जिल्हाभर दौरे केले. संपूर्ण जिल्ह्यातून त्यांनी फक्त एका मतदारसंघांमध्ये उमेदवार सुचवला तरीही मनमानी व्यक्तींनी डावलण्याचा प्रयत्न केला. बँकेमध्ये सोलापूरच्या मतांसाठी तात्यांनी गेले तीन वर्षे मोर्चे बांधणी केली. सत्ता आल्यावर मात्र तात्यांना कधीही बँकेमध्ये पाचारण केले नाही. सल्लागार मंडळ, पार्लमेंटरी बोर्ड, ज्येष्ठ नेते, संघटनेचे बांधणी काळातील कार्यकर्ते या सर्वांना डावलत स्वतः जिल्हाध्यक्ष चेअरमन झाले आणि महाशयांनी बँकेबरोबरच संघटनेत सुद्धा मनमानी सुरू केली. जिल्हाध्यक्षांच्या जुन्या सवंगड्या सोबतचे वाद चव्हाट्यावर आले आहेत. जिल्हा दोन गटांमध्ये विभागला गेला आहे. कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम आहे. या सर्व बाबी तात्यांनी दुरुस्त करणे अनिवार्य आहे.


विश्वास पुजारी

बँकेत सुरु असणारा भ्रष्टाचार, जागा खरेदी, नोकर भरती, कर्मचाऱ्यांना बढती, बांधकाम निधी तरतूद अशा जाहीरनामा विरोधी अनेक बाबी निदर्शनाला येऊन सुद्धा संचालक स्वतःच्या स्वार्थासाठी हुकूमशाहीचे पाईक बनले आहेत. बँकेचे सत्ता लोकांनी संभाजीराव थोरात यांचे नेतृत्व स्वीकारून शिक्षक संघाची कार्यक्षमता पाहून दिली आहे. सभासदांचे हित जपण्याचा नैतिक अधिकार संघटनेचे सर्वेसर्वा म्हणून तात्यांचा आहे. तात्या या भ्रष्टाचाराकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून संघ कार्यकर्त्यांना नाराज करीत आहेत. रत्नागिरी अधिवेशनावरती बहिष्कार टाकत तात्यांचे सर्व आदेश जिल्हाध्यक्ष सोबत सर्व तालुकाध्यक्ष आणि सत्तेत असणारे संचालक या सर्वांनी मिळून तात्यांचा मोठा अपमान केलेला आहे. बेमुदत संपाच्या वेळी सोशल मीडियावरती स्वतः हुकूमशाही बाजू मांडत तात्यांवर चिखलफेक करत कार्यकर्त्यांकरवी तात्यांच्या निषेधाचे पोस्टर सोशल मीडियावरती फिरवले. आपल्याला सत्तेत नेऊन ज्यांनी बसवले अशा नेत्यांसोबतच कार्यकर्त्यांसोबत सांगली जिल्ह्यामध्ये गद्दारी सुरू आहे. बारा ते तेरा वर्ष संघटनेचे जिल्हाध्यक्ष पद स्वतःकडे ठेवले आहे. लोकशाही वरती चालणारा शिक्षक संघ हुकूमशाहीच्या दिशेने वाटचाल करीत आहे. संघामध्ये दूषित वातावरण तयार झाल्याचे चित्र आहे. आदरणीय तात्यांनी आयुष्यात निस्वार्थीपणे शिक्षक प्रश्नांसाठी संघटना मजबूत ठेवली. ज्या ज्या ठिकाणी बँकेत सत्ता आलेली आहे अशा ठिकाणी पैशाच्या मोहामुळे तात्या सोबत गद्दारी झालेली आहे. परंतु तात्यांचा प्रत्येक आदेश उघडपणे डावलणारे इकडच्या काळात तात्यांच्या सोबत भेटी घेतलेले पोस्ट करीत आहेत.

कदाचित बँकेमध्ये सहकार मंत्रालय स्तरावर निर्माण झालेल्या अडचणीसाठी तात्यांचा वापर करून घेण्याचा त्यांचा माणस दिसून येत आहे. इतकी वर्षे अनुभव असणाऱ्या तात्यांनासुद्धा गाळ पाजण्याचे षडयंत्र सुरू ठेवले आहे. त्यांनी या गोष्टींचा वेळीच बंदोबस्त करायला हवा. जिल्ह्यातील शिक्षण संघाकडे जातीने लक्ष देऊन जिल्हा कार्यकारणी नव्या जोमाने बांधणी करून नवीन तरुणांना तसेच बहुजन समाजातील जास्तीत जास्त कार्यकर्त्यांना संधी देऊन संघटना अबाधित ठेवावी. बँकेमध्ये सुद्धा कोणत्याही कारभाऱ्याला बाजूला करून बहुजन गटातील संचालकाला चेअरमन करून सभासद हिताचा कारभार होण्यासाठी प्रयत्न व्हावेत.तात्यांशी कसल्याही पदांची अपेक्षा न करता एकनिष्ठ असणाऱ्या सामान्य कार्यकर्त्यांना न्याय द्यावा.

अन्यथा सांगली जिल्ह्यातून एकनिष्ठ संघ शिलेदारांची मोर्चे बांधणी करत तात्यांचा संघ बचाओआणि सभासदांची बँक बचाओअशी मोहीम हाती घेऊन इथून पुढे निस्वार्थीपणे कार्यरत राहणार आहे अशी घोषणा तात्यांचे निकटवर्तीय विश्वास पुजारी यांनी केलेले आहे.

# तासगाव, कवठेमहांकाळ तालुक्यात दुष्काळ जाहीर करा

## सर्वपक्षीय संघर्ष समितीची तहसीलदारांकडे मागणी : तलाव भरून घ्या, चारा डेपो सुरू करा

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**तासगाव :** तासगावसह कवठेमहांकाळ तालुक्यात यावर्षी समाधानकारक पाऊस झालेला नाही. थोड्याशा ओलीवर झालेल्या खरिपाची पेरणी धोक्यात आली आहे. शिवाय पशुधनही धोक्यात आले आहे. तालुक्यातील तलावांमधील पाणी साठा कमालीचा कमी झाला आहे. त्यामुळे दोन्ही तालुक्यात तातडीने दुष्काळ जाहीर करावा. टंचाईमधून तलाव भरून घ्यावेत. तसेच पशुधन वाचवण्यासाठी चारा डेपो सुरू करावेत, अशी मागणी सर्वपक्षीय संघर्ष समितीने केली आहे. याबाबतचे निवेदन तासगावचे तहसीलदार रवींद्र रांजणे यांना देण्यात आले आहे.

तासगावसह कवठेमहांकाळ तालुक्यात यावर्षी अतिशय कमी पाऊस पडला आहे. गतवर्षीच्या तुलनेत यावर्षी


तासगाव : तहसीलदार रवींद्र रांजणे यांना निवेदन देताना सर्वपक्षीय संघर्ष समितीचे पदाधिकारी

झालेला पाऊस खूपच कमी आहे. ऑगस्ट महिना संपत आला तरी तालुक्यात अनेक भागात दमदार पाऊस झालेला नाही. परिणामी तालुक्यातील सर्वच तलावातील पाणीसाठा खालावला आहे. सुरुवातीला झालेल्या थोड्याफार पावसावर शेतकऱ्यांनी खरीपाची पेरणी केली होती. मात्र त्यानंतर पावसाने दडी दिल्याने खरिपाची पिके कोमेजू लागली आहेत. ऑगस्ट महिना तर पूर्णपणे कोरडा गेला आहे. पावसाळ्यातील सप्टेंबर हा एकच महिना शिल्लक राहिल्याने यावर्षी तालुक्यात पाणी व चारा टंचाई जाणवण्याची शक्यता आहे. सद्यस्थितीला अनेक गावांमध्ये पशुधन वाचवण्यासाठी शेतकऱ्यांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. चारा उपलब्ध करताना शेतकऱ्यांना अनेक अडचणी येत आहेत.

त्यामुळे तालुक्यातील पशुधन वाचवण्यासाठी शासनाने तातडीने चारा डेपो सुरू करावेत. टंचाईमधून तालुक्यातील सर्व तलाव भरून घ्यावेत. तसेच दोन्ही तालुक्यात तातडीने दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी सर्वपक्षीय संघर्ष समितीने केली आहे. ही मागणी मान्य न झाल्यास ११ सप्टेंबर पासून बेमुदत आमरण उपोषण करण्याचा इशारा या समितीने दिला आहे.

तहसीलदार रांजणे यांना दिलेल्या निवेदनावर माजी सैनिक जोतीराम जाधव, शशिकांत डांगे, डॉ. विवेक गुरव, नंदकुमार पाटील, रामदास डावरे, प्रसाद वारे, जितेंद्र कांबळे, प्रमोद पाटील, अमोल कदम, मोहन भंडारे, दत्तकुमार सुर्वे यांच्यासह आहेत.

# पुस्तकांशी मैत्री करा : प्रतिभा पैलवान

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**तासगाव :** साहित्य जगण्याला प्रेरणा देते. पुस्तक वाचनाची आवड आपण लावली पाहिजे साहित्य आपल्याला शेवटपर्यंत साथ देते म्हणून पुस्तकांशी मैत्री करा असे उद्गार प्रसिद्ध कवयित्री प्रतिभा पैलवान यांनी पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील महाविद्यालय तासगाव येथे वाङ्मय मंडळ उद्घाटन व 'संस्कार' अंक प्रकाशन सोहळ्यानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलताना काढले. मराठी , हिंदी , इंग्रजी विभागाच्या वतीने वाङ्मय मंडळाची स्थापना केली. कवयित्री पुढे म्हणाल्या या महाविद्यालयाने मला घडविले माझी पहिली कविता याच महाविद्यालयाने प्रकाशित केली.माझी कविता जगण्याची श्वास झाली असे सांगून मनोरंजनातून त्यांनी समाजप्रबोधन केले.आपल्या वेगवेगळ्या कवितातून विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध केले.यावेळी मराठी विभागाच्या वतीने प्रसिद्ध रानकवी ना.धो.महानोर यांच्या विशेषांकाचे अनावरण तसेच वसंत भित्तिपत्रिकेचे प्रकाशन करण्यात आले.



तासगाव : 'संस्कार' अंक प्रकाशन सोहळ्यानिमित्त उपस्थित मान्यवर

अध्यक्षस्थानावरून बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मिलिंद हुजरे यांनी वाङ्मय मंडळाचा उद्देश समजावून सांगितला विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठीचे हे मुक्त व्यासपीठ असल्याचे त्यांनी सांगितले विद्यार्थ्यांनी वाचनाशी नाळ जोडून महाविद्यालयाची वांङ्मय संस्कृती जोपासण्याचे आवाहन केले. 'संस्कार' वार्षिक अंकाचे प्रकाशन यावेळी मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले. संपादक प्रा.प्रकाश खाडे यांनी विद्यार्थ्यांना कथा, कविता, प्रवासवर्णन, लेख इ.लिहण्याचे आवाहन केले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय सेवकवर्ग, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुकेश अंबानींनी सोपवली नव्या पिढीच्या हाती कमान

## आकाश-ईशाकडे रिलायन्स बोर्डात मोठी जबाबदारी : नीता अंबानी बाहेर

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** रिलायन्स इंडस्ट्रीजच्या संचालक मंडळात मोठे बदल करण्यात आले आहेत. आकाश, अनंत आणि ईशा अंबानी यांना या मंडळात नवीन जबाबदारी देण्यात आली आहे. ईशा अंबानी, आकाश अंबानी आणि अनंत अंबानी यांची बिगर कार्यकारी संचालक म्हणून नियुक्तीला संचालक मंडळाने मान्यता दिली आहे. तसेच नीता अंबानी यांना बोर्डाच्या बाहेर ठेवण्यात आले आहे. मात्र, नीता अंबानी या रिलायन्स फाऊंडेशनच्या अध्यक्षपदी कायम राहतील.

गेल्या वर्षी आकाश अंबानी यांना भारतातील सर्वात मोठी मोबाइल कंपनी रिलायन्स जिओ इन्फोकॉम लिमिटेडचे अध्यक्ष बनवण्यात आले होते. मुकेश अंबानी अजूनही जिओचे चेअरमन आणि रिलायन्स जिओचे मालक आहेत. ईशा अंबानी रिलायन्स रिटेलच्या चेअरपर्सन आहेत आणि अनंत अंबानी एनर्जी बिझनेस सांभाळत आहेत. कंपनीचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक मुकेश अंबानी म्हणाले की, रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडने गेल्या १० वर्षांत एकत्रितपणे १५० अब्ज डॉलर गुंतवणूक केली आहे. भारतीय कॉर्पोरेटने केलेली ही सर्वात मोठी गुंतवणूक आहे. रिलायन्स उदयोन्मुख नवीन भारताचा आश्रयदाता असल्याचंही त्यांनी अधोरेखित केलं आहे.

# पिता-पुत्र सेल्फी काढताना समुद्रात बुडाले

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**वसई :** वसई किल्ला समुद्रकिनार्यावर सेल्फी काढण्याच्या प्रयत्नात मुलगा पाण्यात पडला. त्याला वाचवायला गेलेले त्याचे वडीलही बुडाले. रविवारी संध्याकाळी ही घटना घडली. वसई पोलीस बुडालेल्या पिता-पुत्रांचा शोध घेत आहेत.

वसई पश्चिमेच्या ओम नगर येथे शैलेंद्र मोरे (४२) हे आई आणि मुलगा देवेंद्र (१४) याच्यासोबत रहात होते. रविवारी त्यांनी घरी स्वामी समर्थांचा पाठ आयोजित केला होता. पूजा संपल्यावर निर्माल्य समुद्रात टाकण्यासाठी शैलेंद्र मोरे मुलगा घेऊन दुचाकीने वसई किल्ल्याजवळील समुद्रात गेले होते. निर्माल्य टाकल्यानंतर देवेंद्रे जेटीवरून सेल्फी काढत होता. त्यावेळी त्याचा तोल जाऊन तो पाण्यात पडला. त्याला वाचविण्यासाठी धावत जाऊन त्याच्या वडिलांनी पाण्यात उडी मारली. मात्र ते देखील बुडाले. एका प्रत्यक्षदर्शीने हा प्रकार पाहिला आणि पोलिसांना कळवले. मात्र ते कोण होते याची माहिती मिळत नव्हती. दरम्यान, तिथे असलेल्या दुचाकीवरून सोमवारी दुपारी पोलिसांनी शैलेंद्र मोरे यांचे कुटुंबियांशी संपर्क साधला. वसई पोलिसांचे पथक समुद्रात बेपत्ता पिता-पुत्रांचा शोध घेत आहे. सेल्फी काढण्याच्या प्रयत्नात ही दुर्घटना घडल्याची प्रथमदर्शनी माहिती समोर आली आहे. आम्ही साक्षीदारांचे जबाब नोंदवत आहोत. आमचे पथक बोटीने सर्व समुद्रकिनार्यावर शोध घेत आहोत, अशी माहिती वसई पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रणजीत आंधळे यांनी दिली.






# मानवाच्या चुकीच्या जीवन पद्धतीमुळे कर्करोग होवू शकतो : डॉ. मुकूल घरोटे

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**म्हसवड/प्रतिनिधी :** कर्करोग मानवाच्या चुकीच्या जीवन पध्दती व आहार पद्धती तसेच व्यसनामुळे उद्धवतात. तसेच मानवाच्या शरीरातील अनियंत्रित पेशीत झालेली वाढ यामुळे कर्करोग होऊ शकतो हा आजार झाला तर घाबरुन जावू नये वेळीच योग्य उपचार रुग्णांना मिळाल्यास पूर्ण पुणे बरा होऊ शकतो असे वक्तव्य नाशिक येथील कर्करोग तज्ज्ञ डॉ. मुकूल घरोटे यांनी केले. ते म्हसवड येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिर येथे सर्वज्ञ सेवा संस्थेच्या वतीने कर्करोगाबाबत मार्गदर्शन व तपासणी शिबिरात मार्गदर्शन करताना बोलत होते. यावेळी सर्वज्ञ सेवा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष इंजि.नितिन तिवाटणे व सर्वज्ञ परिवारातील सदस्य डॉ. जितेंद्र तिवाटणे, नितीन चिंचकर यांची प्रमुख उपस्थिती होती.



म्हसवड : सर्वज्ञ सेवा संस्थेच्या वतीने आयोजित कर्करोग निदान व उपचार शिबिरामध्ये मार्गदर्शन करताना डॉ. डॉ. मुकूल घरोटे

पुढे बोलताना डॉ. घरोटे म्हणाले, कर्करोग म्हणजे काय? हा काही संसर्गजन्य आजार नाही तो काही एकमेकांच्या संपर्कात आला म्हणून होत नाही. मानवाच्या शरीरातील अनियंत्रित पेशीतील वाढ. जीवन संगोपन आणि मरण हे मानवाच्या शरीराला एकदाच असले तरी मानवाच्या शरीरातील नवीन पेशी दररोज निर्माण होतात त्यांचे संगोपन रोज होते व त्या रोज मृत्यु होतात. जीवन मरणाची हि सायकल मानवासाठी एकदा असली तरी मानवाच्या शरीरातील पेशींना ती दररोजची आहे. मानवाने तंबाखू, सिगारेट, खैणी, मावा, दारु या गोष्टींच्या व्यसनामुळे व भाजीपाल्या वरील प्रमाणापेक्षा जास्त किटकनाशक वापरलेल्या भाज्या आपण कच्च्या खाल्ल्या तर त्यांने देखील कर्करोगाला निमंत्रण मिळते. मानवाच्या शरीरात अनियंत्रित पेशी वाढल्यामुळे कर्करोग होऊ शकतो. कर्करोगाची लक्षणे मानवाच्या शरीराच्या कोणत्याही भागावर आलेली न दुखणारी गाठ तिच्या कडे दुर्लक्ष न करता वैद्यकीय तज्ज्ञांना दाखवून तपासणी करून घ्यावी व तज्ञांच्या सल्ल्यानुसार त्वरीत उपचार सुरु करावेत. मागील पंधरा वीस वर्षांपूर्वी गावात एखादाच कर्करोगाचा रुग्ण सापडायचा पण आता हे प्रमाण वाढत चालल्याचे दिसून येते.

यावेळी शिबिरात रुग्णांची तपासणी करण्यात आली. या शिबिरात माजी नगराध्यक्ष तुषार विरकर, नितीन दोशी, चैतन्य देशमाने, आप्पासाहेब पुकळे तसेच विविध स्तरातील मान्यवर आणि महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मंत्री अतुल सावे यांनी दिला उमदी घटनेतील विद्यार्थ्यांना धीर

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** उमदी गावामध्ये असलेल्या समता अनुदानित आश्रमशाळेमधील विद्यार्थ्यांना काल दि. २७ ऑगस्ट रोजी रात्री जेवणानंतर अन्नातून विषबाधा झाल्याची लक्षणे दिसून आल्यानंतर या विद्यार्थ्यांना जत, माडग्याळ, कवठेमहांकाळ व मिरज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयात दाखल करण्यात आले. याची दखल घेत गृहनिर्माण व इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी ग्रामीण रूग्णालय जत येथे भेट देवून या घटनेची सविस्तर माहिती घेतली. जत रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांची आस्थेवाईकपणे विचारपूस करून विद्यार्थी व त्यांच्या पालकांना धीर दिला. अन्नातून विषबाधा झालेल्या विद्यार्थ्यांवर आवश्यक ते योग्य उपचार करावेत, अशा सूचना श्री. सावे यांनी आरोग्य प्रशासनास दिल्या.


जत : मंत्री अतुल सावे यांनी उमदी घटनेतील विद्यार्थ्यांना धीर देत त्यांच्या नातेवाईकांची चौकशी केली.

यावेळी प्रांताधिकारी अजयकुमार नष्टे, तहसिलदार जीवन बनसोडे, समाज कल्याण कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त जयंत चाचरकर, वैद्यकीय अधीक्षक श्रीमती डॉ. देशमुख, गटविकास अधिकारी आप्पासो सरगर उपस्थित होते.

# शिपाई वगळून अख्खे उपविभागीय कार्यालय निलंबित

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**गडचिरोली :** कार्यालयात अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या दप्तरदिरंगाईमुळे वैतागलेल्या अहेरी उपविभागीय अधिकारी वैभव वाघमारे यांनी स्वतःच्याच कार्यालयाला कुलूप ठोकून नायब तहसीलदारांसह सर्व कर्मचाऱ्यांना निलंबित केले. यामुळे जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. तर त्रस्त नागरिकांनी वाघमारे यांच्या धडाकेबाज कारवाईचे कौतुक केले आहे.





जिल्ह्यातील अहेरी उपविभाग मागील काही वर्षांपासून विविध कारणांनी चर्चेत आहे. त्यात परिसरातील नागरिकांना अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कामचुकारपणामुळे कार्यालयीन कामासाठी हेलपाटे मारावे लागत होते. परिणामी अनेक कामे खोळंबली होती. महिनाभरापूर्वी वैभव वाघमारे हे उपविभागीय अधिकारी म्हणून रुजू होताच कार्यालयाला शिस्त लावण्याच्या बराच प्रयत्न केला. परंतु कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वर्तनात सुधारणा झाली नाही.

त्यामुळे उपविभागीय अधिकारी वाघमारे यांनी सोमवारी स्वतःच्याच कार्यालयाला कुलूप ठोकून शिपाई वगळता नायब तहसीदारांसह सर्व कर्मचाऱ्यांना निलंबित करण्याचे निर्देश दिले. यांच्या धडाकेबाज कारवाईमुळे जिल्ह्यात एकच खळबळ उडाली असून नागरिकांमधून त्यांचे कौतुक करण्यात येत आहे. यासंदर्भात उपविभागीय अधिकाऱ्यांनी विचारणा केली असता त्यांनी वृत्ताला दुजोरा दिला पण अधिक माहिती देण्यास नकार दिला आहे. त्यामुळे नेमके किती कर्मचारी व अधिकारी निलंबित झाले याविषयी सविस्तर माहिती कळू शकली नाही.

# प्रज्ञान रोव्हरच्या वाटेत भला मोठा

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**नवी दिल्ली :** भारताची चांद्रमोहीम यशस्वी ठरली आहे. विक्रम लँडरच्या मदतीने इस्रोने चांद्रयान-३ हे चंद्राच्या पृष्ठभागावर यशस्वीरित्या उतरवलं आहे. त्यानंतर आता विक्रम लँडर दररोज चंद्रावरील नवनवीन अपडेट्स देत आहे.




चंद्रावरील फोटो, प्रज्ञान रोव्हरचे व्हिडीओ यासह इतर माहिती इस्रोच्या मुख्यालयाला मिळत आहे. दरम्यान, भारतीय अंतराळ संशोधन संस्थेच्या (इस्रो) चांद्रयान-३ च्या विक्रम लँडरने चंद्रावरील तापमानाची माहिती दिली आहे. विक्रम लँडरच्या मॉड्यूलवरील 'चेस्ट' पेलोडद्वारे चंद्राच्या पृष्ठभागावरील मोजलेल्या तापमानातील फरकाचा आलेख रविवारी सायंकाळी प्रसिद्ध करण्यात आला. ''विक्रम लँडरवरील 'चेस्ट' पेलोडने तापमानाबाबत दिलेली ही पहिली माहिती आहे'' असं इस्रोने म्हटलं आहे.

पेलोडवर तापमान मोजण्यासाठी एक यंत्र असून ते पृष्ठभागाच्या १० सेंटीमीटर खोल जाण्यास सक्षम आहे. इस्रोने दिलेल्या माहितीनुसार 'चंद्र सरफेस थर्मो फिजिकल एक्सपेरिमेंट'ने (चेस्ट) चंद्राच्या पृष्ठभागावरील तापमानाची माहिती घेण्यासाठी दक्षिण ध्रुवाच्या पृष्ठभागावरील मातीचं परिक्षण केलं. इस्रोने ट्विटरवर याची माहिती दिली आहे. या माहितीनुसार चंद्रावरील तापमान कधी उणे १० अंश सेल्सिअस तर कधी ७० अंश सेल्सिअस इतकं नोंदवण्यात आलं आहे. इस्रोने सांगितलं की, यामध्ये तापमान मोजण्यासाठी १० सेन्सर्स लावण्यात आले आहेत.दरम्यान, सोमवारी (२८ ऑगस्ट) इस्रोने प्रज्ञान रोव्हरचे काही फोटो शेअर केले. प्रज्ञान रोव्हर चंद्राच्या पृष्ठभागावर फिरत असताना रोव्हरच्या वाटेत एक मोठा खड्डा (ऊरींशी) आला होता. सुदैवाने प्रज्ञान रोव्हरने खड्ड्यामुळे आपला मार्ग बदलला आणि रोव्हर सुरक्षितपणे त्याच्या बेसवर परतला आहे. इस्रोने या खड्ड्याचे फोटो ट्विटरवर शेअर केले आहेत. इस्रोने म्हटलं आहे की, चांद्रयान ३ मोहिमेतील प्रज्ञान रोव्हर २७ ऑगस्ट रोजी चंद्राच्या पृष्ठभागावर फिरत असताना रोव्हर एका मोठ्या खड्ड्याजवळ पोहोचला. त्यानंतर रोव्हरला मागे वळण्याची सूचना (कमांड) देण्यात आली. त्यानंतर रोव्हर सुरक्षितपणे माघारी परतला आहे. प्रज्ञान रोव्हरच्या चाकांचे ठसे चंद्राच्या पृष्ठभागावर उमटले आहेत. या ठशांचा एक फोटो इस्रोने ट्विटरवर शेअर केला आहे.

# ई-केवायसी केलेल्या शेतकऱ्यांकरिता निधी वितरित : मंत्री अनिल पाटील

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** ई - केवायसी केलेल्या राज्यातील ३ लाख शेतकऱ्यांकरिता मदतीचा २१० कोटी ३० लाख रुपयांचा निधी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट जमा करण्याची प्रक्रिया आज मदत व पुनर्वसन मंत्री अनिल पाटील यांच्या हस्ते करण्यात आली. मंत्री श्री. पाटील यांनी संगणकीय प्रणालीवर कळ दाबून निधी वितरणाची प्रक्रिया सुरु केली.


मंत्री अनिल पाटील

गेल्या पावसाळी हंगामात सततच्या पावसामुळे शेतीपिकांच्या झालेल्या नुकसानाकरिता शासनाने विशेष बाब म्हणून १५०० कोटी रुपये इतका निधी मंजूर केला आहे. मदत व पुनर्वसन विभागाने निश्चित केलेल्या डीबीटी प्रणालीमार्फत या निधीचे वितरण सुरु आहे.मंत्रालयामध्ये मदत व पुनर्वसन मंत्री श्री. पाटील यांनी या निधी वितरणाबाबत आढावा घेतला. त्यावेळी ई - केवायसी केलेल्या शेतकऱ्यांच्या बँक खात्यात हा निधी थेट जमा करण्याची प्रक्रिया सुरु केली.

हा निधी लवकरच शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट जमा होईल. तसेच पुढील शुक्रवारपर्यंत आणखी २,५०,००० शेतकऱ्यांकरिता रु.१७८.२५ कोटी इतका निधी त्यांच्या बँक खात्यात जमा केला जाणार असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. त्याचप्रमाणे शेती पिकांच्या नुकसानाकरिता तातडीने मदत मिळावी यासाठी, आपले सरकार सेवा केंद्रामध्ये जाऊन ई - केवायसी करण्याचे मंत्री श्री.पाटील यांनी शेतकऱ्यांना आवाहन केले. ही सेवा नि:शुल्क असल्याची माहिती देखील त्यांनी दिली. तसेच डीबीटी प्रणालीमध्ये काही त्रुटी असल्यास त्या त्रुटीदेखील तातडीने दूर करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. शासन शेतकऱ्यांप्रती सजग असून शेतकऱ्यांकरिता कोणत्याही प्रकारे निधीची कमतरता भासू देणार नसल्याचे मंत्री श्री.पाटील यांनी सांगितले. तसेच शेतकऱ्यांकडून लवकरात लवकर ई-केवायसी करून घेण्याच्या सूचना देखील सर्व तहसील व जिल्हा यंत्रणांना मंत्री श्री.पाटील यांनी दिल्या.

# 'फकिरा' कादंबरीवर चित्रपट करणार : प्रवीण तरडे


पुणे : फकिरा' पुरस्कार प्रवीण तरडे यांना प्रदान करताना मंत्री चंद्रकांतदादा पाटील

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**पुणे :** 'फकिरा' पुरस्काराने मला सन्मानित करण्यात आले, हा माझ्यासाठी आनंदाचा क्षण आहे. मी लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य वाचले आहे. त्यांचे साहित्य खूप मोलाचे आहे. भविष्यात मला जर संधी मिळाली, तर मी नक्कीच लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या 'फकिरा' कादंबरीवर मानधन न घेता चित्रपटनिर्मिती करेन, असे प्रतिपादन दिग्दर्शक-अभिनेते प्रवीण तरडे यांनी केले.

आद्य क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे तेल वात समिती व पुणे शहर जिल्हा मातंग समाज यांच्या वतीने लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त 'फकिरा' पुरस्कार तरडे यांना प्रदान करण्यात आला. यशवंत नडगम यांना मसाहित्यरत्न अण्णा भाऊ साठेफ पुरस्कार, प्रतिभा नारी परिवर्तन संस्था यांना सामाजिक कार्याबद्दल 'गौरव समाजभूषण'पुरस्कार प्रदान करण्यात आला. पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण झाले. रमेश बागवे, आयोजक सुखदेव अडागळे, अविनाश बागवे, रवी पाटोळे, दयानंद अडागळे, सुशीला नेटके आदी उपस्थित होते.

स्वच्छ भारत, सुंदर भारत
स्वच्छ घर, सुंदर घर
खुषखबर! खुषखबर!! खुषखबर!!!
आम्ही आपल्यासाठी घेवून आलो आहोत..........
माणगंगा
सेफ्टीटँक ड्रेनेज क्लीनिंग सर्व्हिस
आपली संडास टाकी, शोषखड्डा, गोबर गॅस टाकी भरलेली आहे का ......... ?
चिंता करू नका......
फक्त खाली दिलेल्या मोबाईल नंबरवर फोन लावा.
आपली संडास टाकी, आधुनिक मशिनच्या सह्याने एकदम वाजवी दरात स्वच्छ करून दिली जाईल.
किरण रणदिवे
7028723789/ 9921030708
टिप :- कृपया फोन करा व जहिरात जपून ठेवा, शेजाऱ्याना उपयोगात येईल.

